सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२६/ 2606
दिनांक 2 2 SEP 2026

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था.
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठीचे संस्था स्तरावरील प्रलंबित पात्र विद्यार्थ्यांचे अर्जांची योग्य पडताळणी करुन अर्ज पुढे पाठविण्याबाबत...**

**संदर्भ :** या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२६/११०७ दिनांक २८.०४.२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ मधील प्रलंबित अर्जांवरील कार्यवाही करण्याकरीता महाआयटी कडून DBT ०.१ पोर्टलला मुदतवाढ दिलेली आहे. तरी संस्थाकडून प्रलंबित अर्ज विभागीय कार्यालयाचे लॉगीनमध्ये प्राप्त होत आहेत. अर्जांच्या योग्य पडताळणीबाबत या कार्यालयचे संदर्भिय परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेले होते. सदर अर्जांची विभागीय कार्यालय स्तरावर पडताळणी करतांना विद्यार्थ्यांच्या अर्जांमध्ये त्रृटी असल्यास असे अर्ज त्रृटींची पुर्तता करण्याकरीता परत पाठविण्यात येत आहेत परंतु असे निदर्शनास येत आहे की, काही संस्थाकडून त्रृटींची पुर्तता करण्याकरीता परत पाठविण्यात आलेले अर्ज त्रृटींची पुर्तता न करताच विभागीय कार्यालयाचे लॉगीनमध्ये पाठविण्यात येत आहेत व त्यामुळे विभागीय कार्यालयाचा कालपव्यय होत आहे व पात्र विद्यार्थ्यांना लाभ देण्यास विलंब होत आहे.

याबाबत सर्व संस्थांना सूचित करण्यात येत आहे की, संस्थास्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची योग्य पाडताळणी करुनच पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विभागीय कार्यालयाचे लॉगीनमध्ये पाठविण्यात यावेत तसेच, विभागीय कार्यालयाने त्रृटींच्या पुर्ततेसाठी परत पाठविलेले अर्ज त्रृटींची पुर्तता करुनच विभागीय कार्यालयाचे लॉगीनमध्ये पाठविण्यात यावेत. त्रृटींची पुर्तता न करता असे अर्ज विभागीय कार्यालयास सादर करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांना लाभापासून वंचित राहावे लागल्यास त्याबाबतची सर्वस्वी संस्थेची जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

**( डॉ.वि.रं.मानकर )**
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.